# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## गणेशोत्सव २०२६ साठी पुणे मेट्रोचे वेळापत्रक आणि प्रवाशांसाठी आवाहन




पुणे - गणेशोत्सवाच्या काळात पुण्यामध्ये येणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित आणि जलद व्हावा यासाठी पुणे मेट्रो सज्ज झाली आहे. उत्सव काळात प्रवाशांची होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता पुणे मेट्रो प्रशासनाने मेट्रो फेऱ्या आणि सेवेच्या वेळेत महत्त्वपूर्ण वाढ केली आहे. या काळात (१४ ते २५ सप्टेंबर) संपूर्ण मेट्रो मार्गावर दर ५ मिनिटांच्या (गर्दीच्या वेळेत) अंतराने मेट्रो गाड्या उपलब्ध असणार आहेत. गणेशोत्सवाच्या सुरुवातीला म्हणजेच १४ ते १६ सप्टेंबर (गणेश चतुर्थी ते बुधवार) दरम्यान सकाळी ६.०० ते रात्री ११.०० या नियमित वेळेत मेट्रो सेवा सुरू राहील. त्यानंतर १७ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर (गौरी पूजन आणि पुढील दिवस) या कालावधीत भाविकांच्या सोयीसाठी विशेष वेळापत्रक लागू करण्यात आले असून, या दिवसांत मेट्रो सेवा सकाळी ६.०० ते मध्यरात्री २.०० वाजेपर्यंत सुरू राहील.

उत्सवाचा मुख्य टप्पा असलेल्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी, म्हणजेच २५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजल्यापासून ते सलग २६ सप्टेंबर २०२६ च्या रात्री ११.०० वाजेपर्यंत (एकूण ४१ तास) पुणे मेट्रोची सेवा अखंडपणे सुरू

राहणार आहे. २७ सप्टेंबर २०२६ पासून मेट्रोची सेवा पुन्हा पूर्ववत व नियमित वेळेनुसार सकाळी ६ ते रात्री ११ अशी सुरू होईल.

म.फुले मंडई स्थानक प्रामुख्याने परतीच्या प्रवासासाठी वापरण्याचे आवाहन:
गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि मध्यवर्ती पुण्यातील गणपती दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी पुणे मेट्रो कडून विशेष आवाहन करण्यात येत आहे. मार्गिका १ वरून प्रवास करणाऱ्या भाविकांनी पेठ भागातील गणपती दर्शनासाठी उतरायला कसबा पेठ मेट्रो स्थानकाचा वापर करावा. पेठ भागात जाण्यासाठी मार्गिका २ वरून येणाऱ्या प्रवाशांनी वनाजच्या बाजूने येणाऱ्या भाविकांनी डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकावर उतरावे, तर रामवाडीच्या बाजूने येणाऱ्या भाविकांनी PMC (पुणे महानगरपालिका) मेट्रो स्थानकाचा वापर करावा. महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकात उतरून गर्दी करणे टाळावे; हे स्थानक मुख्यत्वे फक्त परतीच्या प्रवासासाठी वापरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानक हे गणेशोत्सव काळात १४ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या काळात 'unidirectional' (एकदिशात्मक) स्वरूपात कार्य करेल. त्यानुसार, लोकमान्य टिळक पुतळा येथील द्वार क्रमांक ३ हे फक्त प्रवाशांना स्थानकात प्रवेश करण्यासाठी (आत जाण्यासाठी) खुले असेल, तर छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील द्वार क्रमांक २ हे प्रवाशांना बाहेर पडण्यासाठी उपलब्ध असेल.

जिल्हा न्यायालय येथे Interchange टाळण्याचे गणेशभक्ताना  आवाहन: गणेशदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी मार्गिका १ आणि मार्गिका २ वरील जिल्हा  न्यायालय मेट्रो स्थानक येथे येऊन मार्गिका बदलणे (interchange) टाळावे, याकरिता भविकांनी त्यांच्या मार्गिकांवर असणाऱ्या वर उल्लेखिलेल्या स्थानकांचा (कसबा पेठ स्थानक, PMC स्थानक, छ. संभाजी उद्यान स्थानक) वापर करावा.
सर्व भाविकांनी या नियोजनाचे आणि सूचनांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पुणे मेट्रोकडून करण्यात आले आहे.
Release